**मुंबई, कुर्ला येथील न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग), न्यायालय क्र.५१ यांचे न्यायालय**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे प्रकरण एकवीस अन्वये गुन्हयाचे विवरण

**फौजदारी खटला क्र.** 148 **/पीएस /**२०२५ **निशाणी नं.** 2

१. गुन्हयाची तारीख - 05/ 1 /2025

२. नोंदणी तारीख - 05/ 1 /2025.

३. फिर्यादीचे नांव - महाराष्ट्र सरकार तर्फे पो.नि. कुर्ला पो.स्टे.

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता.- रामअनुज झिनकू यादव
वय 56 वर्षे, रा. बि-वडाळा बी.पी.टी.- कॉलनी रमा माता वाडी कोरबा मिठा नगर.

५. गुन्हयाची थोडक्यात हकीकतः-

तुम्ही दिनांक 05 / 1 /2025 रोजी 20/45 वाजता श्रीकृष्ण चौक, कुर्ला मुंबई, येथे सार्वजनिक ठिकाणी / रस्त्यावर अडथळा निर्माण केले, अशाप्रकारे तुम्ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२ सह ११७ खालील गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

(शि.म.गौरगोंड)
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
न्यायालय क्र.५१, कुर्ला, मुबंई.

दि. २२/०३/२०२५.

**आरोपीचे प्रतिकथन**

प्रश्न १ - तुम्हाला पोलीस पेपर्सच्या कॉपीज मिळाल्या का ?

उत्तर - होय.

प्रश्न २ - तुम्हाला वाचून दाखविलेले तुमच्यावरील गुन्हयाचे विवरण तुम्हाला समजला का ?

उत्तर – होय

प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय. मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

(शि.म.गोरेगांड)
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
न्यायालय क्र.५१, कुर्ला,मुंबई.

दि. २२/०३/२०२५

## न्यायनिर्णय

सदर आरोपीने स्वःच्छेने गुन्हा कबूल करून दया दाखविणेस विनंती केली आहे. आरोपीने स्वःच्छेने गुन्हा कबूल केला असल्यामुळे सरकार पक्षाची केस निर्विवादपणे सिध्द झालेली आहे. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरीता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरून दिसुन येते. त्यामुळे खाली नमूद शिक्षा योग्य व कायदेशीर आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] आरोपीला **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम–२७५ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम** कलम १०२ सह ११७ खालील गुन्हयाकरीता दोषी धरून सदर गुन्हयाबद्दल आरोपीला रक्कम रु. १२००/– (अक्षरी रूपये एक हजार दोनशे मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर दंडाची रक्कम न भरल्यास दोन दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

२] न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला विनामुल्य दयावे.

स्थळ– मुंबई
दि. २२/०३/२०२५

Paid of Rupees :- 1200/-
Receipt No. :- 0041956
CASHIER
Addl. C. M. M.
Kurla Court, Mumbai

(शि.म.गोरेगांड)
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
न्यायालय क्र.५१, कुर्ला,मुंबई.